# डॉ.जे.जे.मगदूम फार्मसी कॉलेज, जयसिंगपूर येथे महाविद्यालयस्तरीय आविष्कार स्पर्धा उत्साहात पार पडली

**जयसिंगपूर (प्रतिनिधी) :**
डॉ. जे. जे. मगदूम फार्मसी कॉलेज, जयसिंगपूर येथे महाविद्यालयस्तरीय आविष्कार स्पर्धा २०२५ चे आयोजन उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले.

या स्पर्धेचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची वृत्ती जोपासणे तसेच त्यांना त्यांच्या अभिनव व मौलिक कल्पना सादर करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा होता.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. परवीन नदाफ यांनी केले, तर प्रास्ताविक आविष्कार समन्वयक डॉ. सतीश किलजे यांनी करून स्पर्धेचा उद्देश व महत्त्व स्पष्ट केले. त्यांनी विद्यार्थ्यांना संशोधनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन विकसित करण्याचे आवाहन केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शितलकुमार एस. पाटील यांनी विद्यार्थ्यांमध्ये शोधक वृत्ती असणे अत्यंत गरजेचे असल्याचे सांगितले. तर परीक्षक म्हणून उपस्थित डॉ. एम. एस. कोंडावर यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणात सांगितले की संशोधक होण्यासाठी केवळ पीएच.डी. करणे आवश्यक नाही; आपण पदविका किंवा पदवी शिक्षण घेत असतानाही आपल्या



आजूबाजूच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी संशोधन करू शकतो.

या कार्यक्रमासाठी दुसरे परीक्षक म्हणून कॉलेजच्या आय.एस.ओ. विभाग प्रमुख डॉ. पल्लवी एन. पाटील उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. प्रमोद बुदुक यांनी विद्यार्थ्यांना संशोधन आणि नवकल्पनांचे महत्त्व समजावून सांगत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

स्पर्धेत शेती आणि पशुसंवर्धन या श्रेणीत उप विजेता कु. ऋतुजा साळुंखे व विजेता कु. हीना पाटील, शुद्ध विज्ञान श्रेणीत उप विजेता कु. हर्ष सावंत, विजेता कु. ऋतुजा हंगंडी, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान श्रेणीत उप विजेता कु. स्वप्ना पाटील, विजेता कु. हार्दिक कोळी, औषध आणि औषधनिर्माणशास्त्र श्रेणीत उप विजेता कु. आदेश पाटील, विजेता कु. प्रतिक लोखंडे या विद्यार्थ्यांना बक्षीस प्रमाणपत्राचे वितरण उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

या कार्यक्रमाला डॉ. जे. जे. मगदूम ट्रस्टचे चेअरमन डॉ. विजय मगदूम आणि व्हाईस चेअर पर्सन अँड. डॉ. सोनाली मगदूम यांचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन महाविध्यालयाचे आविष्कार समन्वयक डॉ. सतीश किलजे आणि प्रा. वर्षा भोजे सदर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. सौरभ समडोळे यांनी केले.